# अधिसूचना

क्र. अ.का./उजि(भू)/पी.पी.1/नाग/कावि–    /2018
जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालय
दिनांक :– 3/05/2018

**भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 अन्वये कलम 11 (1) खालील अधिसूचना**

**मा.क्रमांकः– 3/अ–65/2017–2018, मौजा–सत्रापूर तहसिल – रामटेक जिल्हा–नागपूर**

ज्याअर्थी, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनीयम, 2013 (2013 चा 30) याच्या कलम 3 च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसुल व वन विभाग क्र. संकिर्ण 11/2014/प्र.क्र. 77/अ–2, दिनांक 19 जानेवारी, 2015 (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील 500 हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नागपूर जिल्हयाच्या जिल्हाधिका–यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे' ) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याचे स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसुची दोन मध्ये दिलेली आहे.

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (1) च्या तरतुदीअन्वये असे अधिसूचीत करण्यात येजे की. उक्त जमीनीची उक्त सार्वजनीक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी सदरहु प्रस्तावीत भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे यासोबत जोडलेल्या अनुसुची 3 मध्ये दिलेले आहे. (विस्थापन होणार असेल तर याअनुसूचीमध्ये कारणे नमुद करावी.)

आणि ज्याअर्थी सामाजीक परिणाम निर्धारण सरांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेले आहे.

आणि ज्याअर्थी कलम 43 च्या पोट कलम 1 अन्वये पूनर्वसन व पुनर्वसाहत याप्रयोजनासाठी नियुक्त केलेला प्रशासकाचा तपशिल यासोबत जोडलेल्या अनुसुची पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर याअनुसूचीमध्ये तपशिल नमुद करावा)

त्याअर्थी आता असे धोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 11चे पोट कलम चार नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द  ल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाचे प्रकरण चार ,खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणतीही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही

परंतु उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका—यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सुट देता येईल.

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने यातरतुदीचे बुंध्दी परस्पर उल्लंधन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा शतीची जिल्हाधिका—यांकडून भरपाई दिली जाणार नाही. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (5) अनुसार, जिल्हाधिकारी

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, 2014 (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम 10 च्या उप नियम (3) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका–यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन), पेंच प्रकल्प क्र. 1, नागपूर यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची–एक

### जमीनीचे वर्णन

**भूसंपादन प्रकरण क्रमांक. 3/अ–65/2017–2018**

**गाव – सत्रापूर तालुका – रामटेक, जिल्हा नागपूर, प.ह.नं. 25**

| अ.क्रं. | भूमापन किंवा गट क्रमांक. | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| 1 | 68 | 0.58 |
| | एकूण | 0.58 |

## अनुसूची—दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| **प्रकल्पाचे नाव** | — | खिंडसी पुरक कालवा |
| **प्रकल्पकार्याचे वर्णन** | — | खिंडसी पुरक कालव्याच्या कामाकरिता मौजा सत्रापूर येथील खसरा क्रं 68 मधील 0.58 हे.आर अतिरीक्त जमीन संपादन |
| **समाजाला मिळणारे लाभ**<br>(आर्थिक,रोजगार, पायाभूत सूविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासबंधात | — | प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील शेतक—यांना सिंचनाचा लाभ मिळण्याकरिता |

## अनुसूची—तीन

| | | |
|---|---|---|
| **बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** | :— | विस्थापित होत नाही. |

## अनुसूची—चार

| | | |
|---|---|---|
| सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश.<br>(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा—या अभिकरणाने दिलेला) | :— | भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 10 (क) व त्याअनुषंगाने महसूल व वन विभाग महाराष्ट्र शासन यांची अधिसूचना दि. 13 मार्च 2015 अन्वये सामाजिक प्रमाण निर्धारणातून सूट |

## अनुसूची—पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल**

| | | | |
|---|---|---|---|
| **अ.** | प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात अधिका—याचे पदनाम | :— | निरंक |
| **ब.** | प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता | :— | निरंक |
| **क.** | ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील विस्तृत विवरण (निर्गमित करण्यापुर्वी भरावे) | :— | निरंक |

टिप :— उक्त जमिनीच्या आराखडयाचे भुसंपादीत जमीनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) पेंच प्रकल्प क्र. 1, नागपूर या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :— 3 / 5 / 2018

ठिकाण :— नागपूर

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
पेंच प्रकल्प क्र. 1, नागपूर